# नवजीवन

## सहकारी पतपेढी मर्यादित, कल्याण.

रजि. नं. टीएनए/केएलएन/आरएसआर/सीआर/३३९/१९८६-८७

कार्यालय : १०१-१०२, साई आर्केड, ए विंग, शिवाजी चौक, कल्याण (प.)

## ३१ वा वार्षिक अहवाल

## सन २०२५-२०२६



# ❋ विद्यमान संचालक मंडळ ❋



श्री. विठ्ठल बा. वाळुंज
अध्यक्ष



श्री. मधुकर चिंधा पाटील
उपाध्यक्ष



श्री. शरद रभाजी ठाणगे
सचिव



श्री. बबन बा. चिखले



श्री. शरद रा. परब



श्री. बबन सा. अडसूळ



श्री. हरीभाऊ स. वाळुंज



सौ. रंजना ना. पाटील



श्री. वैभव ना. कुमठेकर



श्री. महेंद्र अ. पाटील



श्री. काशिनाथ ह. इचके



श्री. पांडूरंग भा. खामकर



सौ. योगिता दे. भनगडे



श्री. विलास सी. जाधव
प्र. सरव्यवस्थापक



श्री. बाळ रं. घोरपडे
वसुली अधिकारी

# एकोणचाळीसाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची एकोणचाळीसावी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. ३०–०८–२०२६ रोजी सकाळी १०.०० वा. गीता हॉल, शिवाजी चौक, कल्याण (पश्चिम) येथे संस्थेचे विद्यमान अध्यक्ष मा. श्री. विठ्ठल बाळू वाळुंज यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली आहे. तरी सर्व सभासदांनी सभेत सहभागी व्हावे ही नम्र विनंती.

## • सभेपुढील विषय •

१. दि. १४-०९-२०२५ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. दि. ३१ मार्च २०२६ अखेर संपलेल्या वर्षाचा अहवाल, नफा-तोटा पत्रक व ताळेबंद पत्रक वाचून स्विकृत करणे.
३. सन २०२५-२६ अखेरच्या नफा विभागणीस मंजुरी देणे.
४. सन २०२५-२६ च्या अंदाजपत्रकाची नोंद घेणे व सन २०२६-२०२७ च्या अंदाज पत्रकास मान्यता देणे.
५. सन २०२५-२६ या वर्षाचा अंतर्गत लेखा परिक्षकांचा अहवाल वाचून स्विकृत करणे.
६. सन २०२५-२६ या वर्षाचा वैधानिक लेखा परिक्षकांचा अहवाल वाचून स्विकृत करणे.
७. सन २०२६-२७ या वर्षासाठी अंतर्गत लेखा परिक्षकांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
८. सन २०२६-२७ या वर्षासाठी वैधानिक लेखा परिक्षकांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
९. नागरी पतसंस्था सुधारित आदर्श उपविधी २०२५ स्विकारणेबाबत विचारविनीमय करणे.
१०. वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.
११. मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणारे इतर विषय.

संचालक मंडळाच्या वतीने,

स्थळ : कल्याण
दि. १४-०८-२०२६

सही/-
( शरद रभाजी ठाणगे)
सचिव

---

## - विशेष सूचना -

१) गणसंख्येअभावी तहकूब झालेली सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने घेण्यात येईल. त्या सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही.
२) ज्या सभासदांना अहवालासंबंधी प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी सर्वसाधारण सभेपूर्वी ७ दिवस लेखी स्वरूपात कळवावे. आयत्यावेळी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देणे बंधनकारक राहणार नाही.
३) विद्यार्थी गुणगौरव समारंभाचे आयोजन सभा सुरू होणेपूर्वी एक तास अगोदर केलेले आहे तरी सभासद पालकांनी आपल्या पाल्यास बरोबर घेऊन यावे. ही विनंती.

# संचालक मंडळ

## सन २०२४–२५ ते सन २०२८–२९

**• अध्यक्ष •**
श्री. विठ्ठल बाळू वाळुंज

**• उपाध्यक्ष •**
श्री. मधुकर चिंधा पाटील

**• सचिव •**
श्री. शरद रभाजी ठाणगे

**• संचालक •**

श्री. बबन बाबुराव चिखले
श्री. बबनराव सावळेराम अडसुळ
सौ. रंजना नाना पाटील
श्री. महेंद्र अशोक पाटील
श्री. पांडुरंग भागुजी खामकर
श्री. शरद रामचंद्र परब
श्री. हरीभाऊ सहादू वाळुंज
श्री. वैभव नागनाथ कुमठेकर
श्री. काशिनाथ हरीभाऊ इचके
सौ. योगिता देविदास भनगडे

**• शाखा व्यवस्थापक •**

श्री. अनिल दशरथ नवले
श्री. मनोज सखाराम देसले
श्री. गोरक्ष हरीभाऊ वाळुंज
श्री. गणेश बबन अडसुळ
सौ. अलका पोपट गुंजाळ

**• अंतर्गत लेखा परीक्षक •**
मे. योगेश पाटील ॲण्ड कं.
सनदी लेखापाल

**• वैधानिक लेखा परीक्षक •**
मे. रमेश मिश्रा ॲण्ड कं.
सनदी लेखापाल

**• कायदेविषयक सल्लागार •**

ॲड. श्री. राजेंद्र एस. पालवे
ॲड. श्री. चेतन एच. नाखवा
ॲड. श्री. योगेश डी. पोखरकर

**• बँकर्स •**

दि ठाणे डिस्ट्रिक्ट सेंन्ट्रल को.ऑप. बँक लि., (कल्याण प., कोनगाव व कोळसेवाडी शाखा )
दि हिंदुस्थान को. ऑप. बँक लि., (खडकपाडा शाखा)
दि कल्याण जनता सह. बँक लि., (टिळक चौक)
एसव्हीसी को. ऑप. बँक लि., (शिवाजी चौक व खडकपाडा शाखा)
आयसीआयसीआय बँक लि. (शिवाजी चौक शाखा)
जी. एस. महानगर को. ऑप. बँक लि., (कल्याण पश्चिम व उल्हासनगर शाखा)
दि ठाणे भारत को. ऑप. बँक लि., (शिवाजी चौक शाखा)
बँक ऑफ महाराष्ट्र, (शिवाजी चौक शाखा)
अपना सह. बँक लि. (कल्याण, शाखा)
युको बँक, (उल्हासनगर शाखा)
डी एन एस बँक (उल्हासनगर शाखा)

## • अध्यक्षांचे मनोगत •

आदरणीय सभासद बंधू आणि भगिनींनो,

आपणा सर्वांना सप्रेम नमस्कार,

आपल्या संस्थेचा आर्थिक वर्ष सन २०२५-२०२६ अखेरचा एकोणचाळीसावा वार्षिक अहवाल व आर्थिक पत्रके सादर करतांना अत्यानंद होत आहे.

अहवाल सालात आपली संस्था रू. ६०५२.५४ लाख इतक्या रक्कमेच्या सभासद ठेवी आणि रू. ३७३८.०९ लाख इतकी कर्जे असा एकूण रू. ९७९०.६३ लाख इतक्या रक्कमेचा संमिश्र व्यवसाय करण्यात यशस्वी झाली आहे. गतवर्षीच्या तुलनेत संमिश्र व्यवसाय रू. १५०७.३० लाख इतक्या रकमेने वाढलेला असून आवश्यक त्या तरतूदी नंतर झालेला निव्वळ नफा रू. ७८.२६ लाख इतका आहे. अत्याधुनिक डिजिटल सेवा सुविधांमध्ये तुमच्या संस्थेने तुमच्यासाठी बँकामध्ये प्रचलित असलेल्या निधी हस्तांतरण (फंड ट्रान्सफर), मोबाईल बँकिंग अनुप्रयोग (मोबाईल ॲप), संदेश (एस.एम.एस.) इ. सुविधा मुख्यकार्यालयासह सर्व शाखांमध्ये उपलब्ध केलेल्या आहेत. आपण व आपले कुटूंबीय आणि आप्तेष्ट यांना या सुविधांच्या उपलब्धतेविषयी संदेश आपल्यासारख्या जुन्या जाणत्या आणि संस्था हितैषी सभासदांमार्फत पोहचवावा अशी आपल्याला नम्र विनंती आहे. अधिकाधिक सभासदांनी तुमचा सभासद ग्राहक ओळखा म्हणजेच के.वाय.सी. विषयक नियमांचे काटेकोर पालन आणि पूर्तता करून आय.एम.पी.एस., आर.टी.जी.एस., एन.ई.एफ.टी. इ. निधी संप्रेषण सुविधांचा लाभ घ्यावा व संस्थेच्या व्यवसाय वृद्धीस हातभार लावावा. गरजू सभासदांस कर्ज मिळवून देण्यास मदत करावी. थकीत कर्ज वसूलीस हातभार लावावा. आपल्या ओळखीतले प्रामाणिक सभासद जोडावे व त्यांना ठेवी ठेवण्यास प्रवृत्त करावे. या सर्व बाबींसाठी संस्थेत आपला आदरच होईल.

आपण सर्वजण या नवजीवन पतपेढीचे आदर्श सभासदच नव्हे तर या सहकार पंढरीचे वारकरी आहात. क्रियाशील भक्त आहात. जो आपल्या कर्तव्य व कर्मापासून कधीही विभक्त होत नाही तो खरा भक्त. तुम्हा सभासदांचा स्वतःवर इतका ताबा असायला हवा की परिस्थिती कितीही वाईट असली तरी नेहमी स्वतःविषयी आणि इतरांविषयी चांगलाच विचार करता आला पाहिजे. संत आणि वसंत या दोघांत एक साम्य आहे. वसंताच्या आगमनाने प्रकृती सुधारते आणि संत महात्म्यांच्या आगमनाने संस्कृती सुधारते. जे सतत दुसऱ्याच्या दुःखाने दुःखी आणि दुसऱ्याच्या सुखाने सुखी होतात व नेहमी दुसऱ्यांविषयी ज्यांना खंत असते तेच खरे संत. आपण सर्वजण एकमेकांच्या सुख दुःखात सहभागी होता म्हणून नवजीवन हा एक आदर्श परिवार तयार झाला आहे व तो उत्तरोत्तर वाढत राहो.

संचालक मंडळ, कर्मचारी वृंद, ठेवीदार, दैनिक ठेव प्रतिनिधी सभासद, हितचिंतक, सर्व बँकर्स, सुवर्ण मूल्यांकनकार, मालमत्ता मूल्यांकनकार, अंतर्गत व वैधानिक लेखापरीक्षक, संगणक प्रणाली ऑडिटर, कायदेविषयक सल्लागार, कर सल्लागार यांनी केलेल्या सहकार्याबद्दल मी सर्वांप्रती आभार प्रकट करतो.

सर्वे भवंतु सुखिनः सर्वे संतु निरामयाः । सर्वे भद्राणि पश्यंतु मा कश्चित दुःख भाग्भवेत ।। या जगी सर्वांना सुख लाभो आणि सर्व रोग मुक्त असोत, सर्वांचे कल्याण होवो. दुःख कोणालाही न होवो हीच पंढरीच्या नाथा चरणी मनोमन प्रार्थना.

जय हिंद ! जय सहकार !! जय महाराष्ट्र !!!

श्री. विठ्ठल बाळू वाळुंज
अध्यक्ष
नवजीवन सहकारी पतपेढी मर्यादित, कल्याण.

**कराल बचत तर वाढेल संपत्ती । नाहीतर ओढवेल मोठी आपत्ती**

## नवजीवनच्या आकर्षक ठेव योजना आणि सांप्रत व्याजदर

| अ. क्र. | ठेवीचा प्रकार | कालावधी | व्याजदर (द.सा.द.शे.) |
|---|---|---|---|
| १ | बचत ठेव | ------ | ४ % |
| २ | दैनंदिन ठेव | १२ महिने | ५ % |
| ३ | आवर्त ठेव / रिकरिंग ठेव | १२ महिने | ५.५० % |
| | | १३ ते २५ महिने | ६.५० % |
| | | २६ ते ६० महिने | ७ % |
| ४ | बालविकास ठेव (ठराविक मासिक हप्ता पध्दतीने) | ६० महिने | ७ % |
| ५ | मुदत ठेव | ४६ ते ९० दिवस | ४.५० % |
| | | ९१ ते १८० दिवस | ५.५० % |
| | | १८१ दिवस ते १ वर्ष | ६.५० % |
| | | १३ महिने ते ३६ महिने | ७.५० % |
| | | ३७ महिने ते ६० महिने | ७ % |
| दामदुप्पट ठेव - १०८ महिन्यात दुप्पट रक्कम | | | |

१३ महिने किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीसाठी मुदतठेव रक्कमेवर मासिक व्याज प्राप्ती योजना चालू आहे. तसेच ज्येष्ठ नागरिकांच्या १३ महिने किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीसाठी मुदत ठेवीवर ०.५% जादा व्याज दिले जाते.

## - श्रद्धांजली -

गत वार्षिक वर्षात आणि त्यानंतर सांप्रत अहवाल तयार होईपर्यंतच्या काळात संस्थेचे अधिकारी श्री. गणेश बबनराव अडसूळ, सभासद श्रीमती. पार्वतीबाई हरिभाऊ वाळुंज, द्वारकाबाई विलास विखे, महादेवी कोथूर, तुळसाबाई वि. पाटील, जिजाबाई लोटन पाटील, अलका क. मोरे, शांताबाई जानकाभाऊ भनगडे, सर्वश्री पांडूरंग भागा व्यवहारे, लिलाधर सोनटक्के, ओमकार बागले, विठ्ठल रामदास पाटील, बळीराम ग. ठाणगे, शेखर र. बागूल, सुदाम बरके, दत्तात्रय माळी, नारायण वालावलकर, ईश्वर सुरळे, तुकाराम दुर्गे, प्रकाश साळुंखे, विष्णू व्यवहारे यांचे निधन झालेले आहे. तसेच, देशाच्या सिमेवर अहोरात्र रक्षण करित असलेले सैनिक, नैसर्गिक आपत्तीला बळी पडलेले निष्पाप नागरिक तसेच अन्य क्षेत्रातील मान्यवर या सर्वांना संस्थेच्या कर्मचारी वर्गातर्फे व संचालक मंडळातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.

त्या सर्वांच्या आत्म्यांना चिरशांती लाभो हिच ईश्वर चरणी प्रार्थना !

# • ३९ वा वार्षिक अहवाल •

**मार्च २०२६ अखेर**

सन्माननीय सभासद बंधू-भगिनींनो,

आपल्या संस्थेने एकोणचाळीस वर्षांचा प्रवास पूर्ण करून नव्या वर्षात पदार्पण केले आहे. त्या निमित्ताने आपले स्वागत करून ३९ वा अहवाल आणि मार्च २०२६ अखेरची संस्थेची सांपत्तिक स्थिती दर्शक नफा-तोटा व ताळेबंद पत्रके आपल्या हाती सुपूर्द करताना आनंद होत आहे.

सूर्य अस्ताला गेला तरी त्याचा संधी प्रकाश काही काळ आपल्याला जाणवतो त्याच प्रमाणे केंद्र सरकारचे निश्चलनीकरण, कोवीड १९ महामारी यांच्यामुळे निर्माण झालेले दुष्परिणाम व अर्थव्यवस्थेतील बदल आणि त्यांची सहकार क्षेत्राला बसलेली झळ यांचं अस्तित्व अनेक वर्षांच्या कालावधीनंतर देखील जाणवतच आहे. अशा प्रतिकूल परिस्थितीत सुध्दा सभासदांचा संस्थेवरील दृढ विश्वास व संस्थेबाबतची आस्था तसेच कर्मचारी वर्गाने कर्तव्यदक्षतेने सभासदांना दिलेली आपुलकीची सेवा यामुळे आपली संस्था प्रगतीपथाकडे वाटचाल करीत आहे. आपल्या संस्थेने वर्षभरात जे व्यवहार केले त्यांचा थोडक्यात उल्लेख करून प्रगतीची वस्तुस्थिती सादर करीत आहोत.

## संचालक मंडळाच्या सभा

अहवाल वर्षात संचालक मंडळाच्या एकूण २० सभा झाल्या.

## सभासद

मार्च २०२५ अखेर सभासद संख्या ६६११ इतकी होती. अहवाल वर्षात ३५३ नवीन सभासद झाले व १४८ इतके सभासद कमी झाले. त्यामुळे मार्च २०२६ अखेर सभासद संख्या ६८१६ इतकी आहे.

## भाग भांडवल

मार्च २०२५ अखेर संस्थेचे भाग भांडवल रू. २,०१,१४,३००/- इतके होते. अहवाल वर्षात भाग भांडवलात रू. ७,०८,०००/- इतकी वाढ झालेली आहे. त्यामुळे मार्च २०२६ अखेर वसूल भाग भांडवल रू. २,०८,२२,३००/- इतके झालेले आहे.

## निधी

संस्थेच्या निधींमध्ये उत्तरोत्तर वाढ होत आहे. मार्च २०२५ अखेर निधींची एकूण रक्कम रू. ८,४१,३०,५३२/- इतकी होती. अहवाल वर्षात या रक्कमेत रू. १,०५,६५,६००/- इतकी भरीव वाढ झालेली आहे. त्यामुळे मार्च २०२६ अखेर निधींची एकूण रक्कम रू. ९,४६,९६,१३२/- इतकी झालेली आहे.

## सभासद ठेवी

**१) बचत ठेव –** मार्च २०२५ अखेर रू.४,२८,२२,७५९.६८ इतक्या रकमेच्या बचत ठेवी होत्या. वर्षभरात रू.१,४५,०६,३३७.५० इतकी वाढ होऊन मार्च २०२६ अखेर रू. ५,७३,२९,०९७.१८ इतक्या रकमेच्या बचत ठेवी आहेत.

**२) मुदत ठेव –** मार्च २०२५ अखेर रू. ३८,३२,३५,४५६/- इतक्या रकमेच्या मुदत ठेवी होत्या. वर्षभरात त्यामध्ये रू. ४,९८,९७,२८५/- इतकी घट होऊन मार्च २०२६ अखेर रू. ३३,३३,३८,१७१/- इतक्या रकमेच्या मुदत ठेवी आहेत. प्रत्यक्षात ही घट नसून नवजीवन स्वप्नपूर्ती ठेव योजनेत झालेले रूपांतर आहे.

**३) दैनंदिन ठेव –** मार्च २०२५ अखेर रू. ३,३९,६०,५०९/- इतक्या रकमेच्या दैनंदिन बचत ठेवी होत्या. वर्षभरात त्यामध्ये रू. ६०,६५,९१५/- इतकी वाढ झालेली आहे. परिणामी मार्च २०२६ अखेर रू. ४,००,२६,४२४/- इतक्या रकमेच्या दैनंदिन ठेवी आहेत. व्यावसायिक व उद्योजकांनी संस्थेमध्ये दैनंदिन ठेव खाते उघडून बचत करावी. वेळ प्रसंगी संस्था त्यांना कर्जरूपाने अर्थसहाय्य उपलब्ध करील.

**४) बालविकास ठेव –** मार्च २०२५ अखेर रू. २१,५७,२१८/- इतक्या रकमेच्या बाल विकास ठेवी होत्या. त्यामध्ये वर्षभरात रू. २,२३,६४५/- इतकी घट होऊन मार्च २०२६ अखेर रू. २३,८०,८६३/- इतक्या रकमेच्या बालविकास ठेवी आहेत.

**५) कर्ज सुरक्षा ठेव –** मार्च २०२५ अखेर रू. १,५७,४०,३८२/- इतक्या रकमेच्या सुरक्षा ठेवी होत्या. त्यामध्ये वर्षभरात रू. ४,७६,६२९/- इतकी वाढ झालेली आहे. परिणामी मार्च २०२६ अखेर रू. १,६२,१७,०११/- इतक्या रकमेच्या कर्ज सुरक्षा ठेवी आहेत.

**६) रिकरिंग ठेव –** मार्च २०२५ अखेर रू. ४२,६६,९४७/- इतक्या रकमेच्या रिकरिंग ठेवी होत्या. वर्षभरात त्यामध्ये रू. ११,००,६९५/- इतकी घट होऊन मार्च २०२६ अखेर रू. ३१,६६,२५२/- इतक्या रकमेच्या रिकरिंग ठेवी आहेत.

**७) मासिक व्याज ठेव –** मार्च २०२५ अखेर ठेवींची रक्कम रू. १,८१,३१,८८१/- इतकी होती. वर्षभरात रू. ३२,७१,८६०/- इतकी घट होऊन मार्च २०२६ अखेर ठेवींची एकूण रक्कम रू. १,४८,६०,०२१/- इतकी आहे.

**८) नवजीवन स्वप्नपूर्ती ठेव योजना –** ही योजना अहवाल वर्षात मर्यादित कालावधीसाठी सुरू करण्यात आली होती. या ठेव योजनेत एकूण रू. १३,३६,५२,७५८/- इतक्या रक्कमेचे संकलन झाले. मुदत ठेवींमध्ये अनुभवयास आलेली घट म्हणजे या ठेव योजनेत झालेले रूपांतरण आहे.

**९) इतर ठेवी –** मार्च २०२५ अखेर कर्मचारी सुरक्षा ठेव, दैनंदिन ठेव प्रतिनिधी सुरक्षा ठेव,(आवर्त व मुदत) व संचालक सुरक्षा ठेव मिळून रू. ४५,३५,३४४/- इतक्या रकमेच्या ठेवी होत्या. वर्षभरात त्यामध्ये रू. २,९२,०५४/- इतकी घट होऊन मार्च २०२६ अखेर रू. ४२,८३,२९०/- इतक्या ठेवी आहेत.

**एकूण ठेवी –** मार्च २०२५ अखेर ठेवींची एकूण रक्कम रू. ५०,४८,५०,४९६.६८ इतकी होती त्यामध्ये अहवाल वर्षात रू. १०,०४,०३,३९०.५० इतकी वाढ झालेली आहे. परिणामी मार्च २०२६ अखेर रू. ६०,५२,५३,८८७.१८ इतक्या रकमेच्या एकूण ठेवी आहेत. अहवाल वर्षात एकूण ठेवींमध्ये २०% इतकी वाढ झालेली असून आमच्यासाठी ती स्पृहणीय आहे.

## कर्जे

**१) वैयक्तिक जामिनकी कर्ज –** मार्च २०२५ अखेर रू. २,२६,०७,४६५/- इतकी रक्कम कर्ज येणे बाकी होती. अहवाल वर्षात ५३ सभासदांना रू. ५१,५०,०००/- इतक्या रकमेचे कर्ज वाटप करण्यात आले आणि रू. ९५,७५,४०१/- इतकी रक्कम वसूल झाली. परिणामी मार्च २०२६ अखेर रू. १,८१,८२,०६४/- इतकी रक्कम येणे बाकी आहे.

**२) मालमत्ता तारण कर्ज –** मार्च २०२५ अखेर रू. १४,३७,७६,४४७/- इतकी रक्कम कर्ज येणे बाकी होती. अहवाल वर्षात २८ सभासदांना रू. ५,८३,९५,०००/- इतक्या रकमेचे कर्ज वाटप करण्यात आले आणि रू. ४,२७,३०,८५६/- इतकी रक्कम वसूल झाली. परिणामी मार्च २०२६ अखेर रू. १५,९४,४०,५९१/- इतकी रक्कम येणे बाकी आहे.

**३) वाहन तारण कर्ज –** मार्च २०२५ अखेर रू. ००/- इतकी रक्कम कर्ज येणे बाकी होती. अहवाल वर्षात नवीन कर्ज वाटप झाले नाही. वर्षभरात रू. ००/- इतकी रक्कम वसूल झाली. परिणामी मार्च २०२६ अखेर रू. ००/- इतकी रक्कम येणे बाकी आहे.

**४) व्यवसाय कर्ज –** मार्च २०२५ अखेर रू. ४२,०४,७२२/- इतकी रक्कम कर्ज येणे बाकी होती. अहवाल वर्षात नवीन कर्ज वाटप झाले नाही. वर्षभरात रू. २४,२७,३६२/- इतकी रक्कम वसूल झाली. परिणामी मार्च २०२६ अखेर रू. १७,७७,३६०/- इतकी रक्कम येणे बाकी आहे.

**५) सोने तारण कर्ज –** मार्च २०२५ अखेर रू. ३,५५,९३,७४४/- इतकी रक्कम कर्ज येणे बाकी होती. अहवाल वर्षात १५५ सभासदांना रू. ५,७३,६७,६००/- इतक्या रकमेचे कर्ज वाटप करण्यात आले आणि रू. १,८९,२५,१३७/- इतकी रक्कम वसूल झाली. परिणामी मार्च २०२६ अखेर रू. ७,४०,३६,२०७/- इतकी रक्कम येणे बाकी आहे.

**६) ठेव तारण व एन.एस.सी./एल.आय.पी. कर्ज –** मार्च २०२५ अखेर रू. ३,२७,६३,५२८/- इतकी रक्कम कर्ज येणे बाकी होती. अहवाल वर्षात ४९ सभासदांना रू. १,६२,१४,७००/- इतक्या रकमेचे कर्ज वाटप करण्यात आले आणि रू. १,३६,४१,४२९/-इतकी रक्कम वसूल झाली. परिणामी मार्च २०२६ अखेर रू. ३,५३,३६,७९९/- इतकी रक्कम येणे बाकी आहे.

**७) कॅश क्रेडिट/ओव्हरड्राफ्ट कर्ज –** मार्च २०२५ अखेर रू.३४,७७,१३६/- इतकी रक्कम कर्ज येणे बाकी होती. अहवाल वर्षात नवीन कर्ज वाटप झाले नाही. रू. ९५,७३९/- इतकी वसुली वजा जाता मार्च २०२६ अखेर रू. ३३,८१,३९७/- इतकी रक्कम येणे बाकी आहे.

**८) घर कर्ज –** मार्च २०२५ अखेर रू. ७,०८,६९,७०८/- इतकी रक्कम कर्ज येणे बाकी होती. अहवाल वर्षात ८ सभासदांना रू. १,६२,६५,०००/- इतक्या रकमेचे वाटप करण्यात आले आणि रू. १,४६,४९,९१०/- इतकी रक्कम वसूल झाली. परिणामी मार्च २०२६ अखेर रू. ७,२४,८४,७९८/- इतकी रक्कम येणे बाकी आहे.

**९) ग्राहक कर्ज –** मार्च २०२५ अखेर रू. ६१,५५०/- इतकी रक्कम कर्ज येणे बाकी होती. अहवाल वर्षात नविन कर्ज वाटप झालेले नाही. वर्षभरात रू. ३६,०००/- इतकी रक्कम वसूल झाली परिणामी मार्च २०२६ अखेर रू. २५,५५०/- इतकी रक्कम येणे बाकी आहे.

**९) कर्मचारी गृह व वैयक्तिक कर्जे** – मार्च २०२५ अखेर रू. १,०१,२८,७६१/- इतकी रक्कम कर्ज येणे बाकी होती. अहवाल वर्षात कर्ज वाटप झाले नाही. वर्षभरात रु. ९,८४,२०७/- इतकी रक्कम वसूल झाली. परिणामी मार्च २०२६ अखेर रू. ९१,४४,५५४/- इतकी रक्कम येणे बाकी आहे.

**एकूण कर्जे** – मार्च २०२५ अखेर सर्व प्रकारच्या कर्जांपोटी रू. ३२,३४,८३,०६१/- इतकी रक्कम येणे बाकी होती. अहवाल वर्षात २९३ सभासदांना रू. १५,३३,९२,३००/- इतक्या रकमेचे वाटप करण्यात आले आणि वर्षभरात रू. १०,३०,६६,०४१/- इतकी रक्कम वसूल झाली. परिणामी मार्च २०२६ अखेर रू. ३७,३८,०९,३२०/- इतकी रक्कम येणे बाकी आहे. कर्जांमधील वाढीचे प्रमाण १५.५६ % इतके असून गत वर्षीच्या तुलनेत समाधानकारक आहे.

## नफा विभागणी

संस्थेचा प्रशासकीय व इतर खर्च वजा जाता संस्थेस रू. ७८,२५,७९३.३० निव्वळ नफा झालेला आहे. त्यामध्ये मागील वर्षाचा शिल्लक नफा रू. ७४५.२८ मिळविल्यानंतर नफा विभागणीस रू. ७८,२६,५३८.५८ इतकी रक्कम उपलब्ध होते. तरी संचालक मंडळाने खाली सुचविल्याप्रमाणे नफा विभागणीस आपण मंजुरी द्याल अशी अपेक्षा आहे.

| अ. क्र. | तपशील | रूपये पैसे |
|---|---|---|
| १ | राखीव निधी २५% ........................ | १९,५६,६३५.०० |
| २ | लाभांश १० % ........................ | २०,३८,४०४.०० |
| ३ | इमारत निधी ........................ | १२,००,०००.०० |
| ४ | आकस्मिक निधी ........................ | ७,००,०००.०० |
| ५ | कर्ज सुरक्षा निधी ........................ | ३,००,०००.०० |
| ६ | तंत्रज्ञान विकास निधी ........................ | ४,००,०००.०० |
| ७ | सभासद कल्याण निधी ........................ | १,१५,०००.०० |
| ८ | कर्मचारी कल्याण निधी ........................ | १,१५,०००.०० |
| ९ | गुंतवणूक चढउतार निधी ........................ | ८,००,०००.०० |
| १० | लाभांश समानीकरण निधी ........................ | २,००,०००.०० |
| ११ | पुढील वर्षासाठी शिल्लक नफा ........................ | १,४९९.५८ |
| | एकूण नफा ........................................................ | ७८,२६,५३८.५८ |

## थकबाकी वसूली

अहवाल वर्षाच्या प्रारंभी वसुली कारवाईसाठी एकूण ९२ दावे होते. ४२ कर्जदारांविरूद्ध नव्याने दावे दाखल करण्याकरिता ठराव केले गेले. अशा एकूण १३४ प्रकरणांपैकी २६ कर्जखाती बंद झाली आहेत. उर्वरित १०८ कर्ज प्रकरणांपैकी ७३ कर्ज प्रकरणात कलम १०१ अन्वये कारवाई व पाठपुरावा सुरू आहे. एस.आर.ओ. कडे कारवाईसाठी असलेली प्रकरणे ३५ आहेत.

सध्या थकबाकीचे प्रमाण ७.६५% इतके आहे. कर्ज थकबाकी असलेल्या सभासदांनी थकित रक्कम भरणा करून संस्थेस सहकार्य करावे व पुढील कायदेशीर कारवाई टाळावी अशी आमची प्रामाणिक इच्छा आहे..

## अनुत्पादक जिंदगी (एन.पी.ए)

सहकार खात्याने सन २००६ पासून एन.पी.ए. निकष लागू केलेले आहेत. त्यानुसार आपल्या संस्थेला अनुत्पादक जिंदगीसाठी रू. १५०.०० लाख इतकी तरतूद करणे आवश्यक असतांना संस्थेने रू. २०५.५४ लाख इतकी तरतूद केलेली आहे. तसेच उत्तम जिंदगीसाठी रू. ७.८४ लाख इतकी तरतूद करणे आवश्यक असतांना रू. १२.०० लाख इतकी तरतूद केलेली आहे. संस्थेच्या ढोबळ एन. पी. ए. चे प्रमाण १६.१२% इतके आहे तर निव्वळ एन. पी. ए. चे प्रमाण १०.३९ % इतके आहे.

## सहकार प्रशिक्षण

अहवाल वर्षात महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित, पुणे यांच्यातर्फे आयोजित दि. १३ मार्च २०२६ ते १५ मार्च २०२६ या कालावधीतील प्रशिक्षण वर्गाचा संस्थेच्या १३ संचालकांनी व १६ कर्मचाऱ्यांनी आणि ३३४ सभासदांनी लाभ घेतला.

## हिशोब तपासणी

सन २०२५-२०२६ या सहकार वर्षासाठी वैधानिक लेखा परीक्षक म्हणून मे. रमेश मिश्रा ॲण्ड् कंपनी सनदी लेखापाल यांची नेमणूक करण्यात आली होती. त्यांनी संस्थेचे लेखा परीक्षण पूर्ण करून त्यांचा अहवाल संस्थेस सादर केलेला आहे व संस्थेस ‘अ’ वर्ग प्रदान केला आहे. त्यांनी केलेल्या बहुमोल सूचना व मार्गदर्शनाबद्दल आभार !

तसेच संस्थेचे अंतर्गत लेखा परीक्षक मे. योगेश पाटील ॲण्ड कं., सनदी लेखापाल यांनी सन २०२५-२०२६ या वर्षाचे लेखा परिक्षण पूर्ण करून त्यांचा अहवाल संस्थेस सादर केला आहे. त्यांनी केलेल्या सूचना व मार्गदर्शनाबद्दल आभार !

## अत्याधुनिक सेवा सुविधा

सभासदांना सुलभ व जलद सेवा पुरविण्याच्या हेतूने संस्थेने पिओसिट सॉफ्टवेअर (संगणक प्रणाली) कार्यान्वित केली असून अल्पावधीत सी.बी.एस. (कोअर बँकिंग सुविधा) सुरू झाली आहे तसेच पिओसिट सॉफ्टवेअर कंपनी व आय.सी.आय.सी.आय बँकेच्या मार्फत डिजिटल सेवा (फंड ट्रान्सफर/एन.ई.एफ.टी./आरटीजीएस.) इत्यादि सुविधा सुरू झालेल्या आहेत. आपल्या संस्थेचे स्वतंत्र मोबाईल ॲपही उपलब्ध झालेले आहे.

## सेवक वर्ग

अहवाल वर्ष अखेर, आपल्या संस्थेत प्रशिक्षित कायमस्वरूपी कर्मचाऱ्यांमध्ये ५ व्यवस्थापक, ४ लिपिक, आणि हंगामी कर्मचाऱ्यांमध्ये ४ लिपिक , १ शिपाई, व २ वरिष्ठ अधिकारी यांचा समावेश असून एकूण कर्मचारी संख्या १६ आहे.

## ऋणनिर्देश

मा. श्री. सुरेश (बाळ्या मामा) म्हात्रे-खासदार, मा. श्री. विश्वनाथजी भोईर, आमदार कल्याण, मा.श्रीमती हर्षाली चौधरी - थविल, महापौर, कल्याण डोंबिवली महानगर पालिका आणि मा. श्री. कपिलजी पाटील - माजी खासदार, यांच्या सहकार्याबद्दल व मार्गदर्शनाबद्दल आभार !

मा. डॉ. किशोर मांडे साहेब, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था ठाणे यांच्या मार्गदर्शन व सहकार्याबद्दल आभार !, श्री. विशाल जाधवर माजी उपनिबंधक, श्री. एस. पी. कांदळकर, उपनिबंधक सहकारी संस्था कल्याण यांनी वेळोवेळी केलेल्या सूचना व मार्गदर्शनाबद्दल आभार ! विशेष वसुली व विक्री अधिकारी श्री. एकनाथ टोहके यांच्याकडून मिळत असलेल्या वसुली विषयक सहकार्याबद्दल आभार आणि श्री. तानाजी के. पानसकर, जिल्हा सहकार विकास अधिकारी यांचेही विशेष सहकार्याबद्दल आभार.

मा. श्री. प्रकाशजी भोईर व नरेंद्रजी पवार, (माजी आमदार, कल्याण), मा. श्री. व. स. पाटील (सभागृह नेता) (क.डों.म.पा.) यांचे मार्गदर्शनाबद्दल आभार.

संस्थेचे कायदेविषयक सल्लागार ॲड. राजेंद्र एस्. पालवे आणि ॲड. योगेश डी. पोखरकर व ॲड चेतन नाखवा यांनी केलेल्या मार्गदर्शनाबद्दल आभार ! मे. पिओसिट सॉफ्टवेअर सोल्युशनच्या कर्मचारी वर्गाचे सततच्या सहकार्याबद्दल धन्यवाद.

दि ठाणे डिस्ट्रिक्ट सेंट्रल को. ऑप. बँक लि. कल्याण (प.), कोनगाव व कोळसेवाडी शाखा, जी. एस. महानगर को. ऑप .बँक लि. कल्याण (प.) व उल्हासनगर शाखा, दि हिंदुस्थान को. ऑप. बँक लि., खडकपाडा शाखा, दि ठाणे भारत को. ऑप. बँक लि, शिवाजी चौक शाखा, दि कल्याण जनता सह. बँक लि., टिळक चौक शाखा, एस. व्ही. सी. को. ऑप. बँक लि., शिवाजी चौक आणि खडकपाडा शाखा, बँक ऑफ महाराष्ट्र, शिवाजी चौक शाखा, युको बँक, उल्हासनगर नं. १ शाखा, आयसीआयसीआय बँक, शिवाजी चौक शाखा आणि डोंबिवली नागरी सहकारी बँक लि., शहाड शाखा या बँकांचे व्यवस्थापक, अधिकारी आणि कर्मचारी वर्ग यांनी वेळोवेळी केलेल्या सहकार्याबद्दल आभार !

श्री. मोहन ल. वाळुंज, प्रोप्रा. मे. सोनी कॉम्प्युटर्स, यांनी केलेल्या सुबक अहवाल छपाईबद्दल आभार !

संस्थेचे सभासद, ठेवीदार, हितचिंतक, कर्मचारीवृंद तसेच दैनंदिन ठेव प्रतिनिधी या सर्वांच्या सहकार्याबद्दल आभार !

संस्थेच्या कामकाजात संचालक मंडळाने केलेल्या सहकार्याबद्दल आभार !

आमच्या वर सभासदांनी ठेवलेल्या विश्वासाची जाण ठेवून संस्थेच्या उत्कर्षासाठी सर्वंकष प्रयत्न करण्याची ग्वाही देतो आणि हा अहवाल पूर्ण करतो.

जय हिंद ! जय महाराष्ट्र ! ! जय सहकार !!!

संचालक मंडळाच्या वतीने,
श्री. विठ्ठल बाळू वाळुंज
अध्यक्ष

## • संस्थेची खास वैशिष्ट्ये •

- संस्थेची अधिकांश कार्यालये स्वतःच्या मालकीची व संगणकीकृत.
- ठेवींवर आकर्षक व्याज दर.
- लहान मुलांच्या उज्वल भविष्यासाठी बालविकास व आवर्त ठेव योजना
- सभासदांना विनम्र, सुलभ व तत्पर सेवा.
- सभासदांना स्नेहपूर्वक व आदरयुक्त वागणूक.
- स्वबळावर उभी असलेली संस्था.

## दिनांक ३१-३-२०२६ रोजीचे

| सन २०२४-२५ रक्कम रुपये पैसे | जबाबदारी व देणी | | सन २०२५-२६ रक्कम रुपये पैसे |
|---|---|---|---|
| ३,००,००,०००.०० | **अधिकृत भाग भांडवल** | | ३,००,००,०००.०० |
| | वसूल भाग भांडवल | | |
| २,०१,१४,३००.०० | प्रत्येकी रु. १०० प्रमाणे २,०८,२२३ भाग | | २,०८,२२,३००.०० |
| | **राखीव व इतर निधी** | | |
| १,८३,६२,२५०.०० | राखीव निधी | २,००,२३,९१५.०० | |
| ३,१२,५५,८९०.०० | इमारत निधी | ३,१५,६४,९००.०० | |
| १,५७,८६,२५७.०० | बुडीत व संशयित कर्ज निधी | २,०५,५४,२५७.०० | |
| ७,००,०००.०० | उत्तम जिंदगीवरील तरतूद | १२,००,०००.०० | |
| १३,८६,६००.०० | सभासद कल्याण निधी | १३,५०,३०५.०० | |
| ४,७४,०७७.०० | धर्मादाय निधी | ४,६६,८७६.०० | |
| १३,९८,२०७.०० | लाभांश समानीकरण निधी | १४,९८,२०७.०० | |
| ११,०२,०००.०० | कर्मचारी कल्याण निधी | १२,२२,०००.०० | |
| १७,३१,२५८.०० | कर्मचारी ग्रॅच्युईटी निधी | २४,३१,२५८.०० | |
| ३९,२४,८३६.०० | आकस्मिक निधी | ४५,२४,८३६.०० | |
| २४,२४,१५७.०० | कर्ज सुरक्षा निधी | ३१,४८,५७८.०० | |
| २७,६८,०००.०० | संशयित व बुडीत कर्ज व्याज निधी | ३७,११,०००.०० | |
| २८,१७,०००.०० | गुंतवणूक चढउतार निधी | ३०,००,०००.०० | ९,४६,९६,१३२.०० |
| | **सभासद ठेवी** | | |
| ४,२०,२५,६५५.६८ | बचत ठेव | ५,६५,९५,३२३.१८ | |
| ७,९७,१०४.०० | बचत ठेव (डॉरमन्ट) | ७,३३,७७४.०० | |
| ३३,२४,९९,४३३.०० | दीर्घ मुदत ठेव | २७,८२,७४,२४१.०० | |
| १,६७,४६,६९४.०० | अल्प मुदत ठेव | १,६३,५२,३४७.०० | |
| ३,३९,८९,३२९.०० | दामदुप्पट ठेव | ३,८७,११,५८३.०० | |
| २१,५७,२१८.०० | बालविकास ठेव | २३,८०,८६३.०० | |
| १,८१,३१,८८१.०० | मासिक व्याज प्राप्ती ठेव | १,४८,६०,०२१.०० | |
| ३,३९,६०,५०९.०० | दैनंदिन ठेव | ४,००,२६,४२४.०० | |
| १,५७,४०,३८२.०० | कर्ज सुरक्षा ठेव | १,६२,१७,०११.०० | |
| ४२,६६,९४७.०० | आवर्त ठेव | ३१,६६,२५२.०० | |
| ४,४५,८७८.०० | कर्मचारी सुरक्षा ठेव | ४,८६,००६.०० | |
| ७,६२,९५०.०० | दैनंदिन ठेव प्रतिनिधी सुरक्षा ठेव (आवर्त ठेव) | २,३४,७११.०० | |
| ८,४५,६२६.०० | संचालक सुरक्षा ठेव | ९,१५,३९०.०० | |
| २४,८०,८९०.०० | दैनंदिन ठेव प्रतिनिधी सुरक्षा ठेव (मुदतठेव) | २६,४७,१८३.०० | |
| ००.०० | नवजीवन स्वप्नपुती ठेव | १३,३६,५२,७५८.०० | ६०,५२,५३,८८७.१८ |
| ६०,९०,९५,३२८.६८ | पुढील पानावर चालू.... | | ७२,०७,७२,३१९.१८ |

## ताळेबंद पत्रक

| सन २०२४-२०२५ रक्कम रुपये पैसे | जिंदगी व येणी | | सन २०२५-२०२६ रक्कम रुपये पैसे |
|---|---|---|---|
| | **रोख व बँक शिल्लक** | | |
| २०,९३,८३२.०० | हातातील रोख शिल्लक | ७९,२७,६६४.०० | |
| ८,२३,७८४.४० | दि ठाणे डिस्ट्रिक्ट सेंट्रल को. ऑप. बँक लि. | ८,७९,३२७.७० | |
| १,६०,८४९.६४ | दि ठाणे डि. सेंट्रल को.ऑ. बँक लि. (बचत खाते) | १,६५,५०७.६४ | |
| ९,१८,६९३.७२ | दि कल्याण जनता सह.बँक लि. | २६,१२१.५२ | |
| १०,११,५८७.०४ | जीएस महानगर को. ऑप. बँक. लि. | १५,६६,३१३.७६ | |
| ४,९६,९७३.०० | दि हिंदुस्थान को. ऑप. बँक लि. (बचत खाते) | ००.०० | |
| ३७,७१०.६२ | बँक ऑफ महाराष्ट्र | ४७,६७४.५२ | |
| १३,५३,७९२.९६ | दि ठाणे भारत सहकारी बँक लि. | ३०,२०,१०२.५६ | |
| १३,८७१.०० | एसव्हिसी. को.ऑप.बँक लि. शिवाजी चौक | ३७,९१९.०० | |
| ५,१५,१९६.९२ | आयसीआयसीआय बँक लि. | ४,८६,०३९.३० | |
| ७४,१६५.०१ | युको बँक , उल्हासनगर | १,४१,९६३.०१ | |
| १८,३५४.२८ | जीएस महानगर को. ऑप. बँक, उल्हासनगर | ४५,२६५.०६ | |
| ६,३४,८५३.०० | एसव्हिसी को.ऑप. बँक लि. खडकपाडा | ६,४५,८७५.०० | |
| २,६६,१२३.६९ | अपना सहकारी बँक लि. | ४,०५,७९८.८९ | |
| ८,८५,७१७.५२ | दि ठाणे डिस्ट्रिक्ट सेंट्रल को.ऑप.बँक लि. कोनगाव | ६,६९,७५७.९४ | |
| १,५२,१२२.२६ | दि ठाणे डिस्ट्रिक्ट सें.को.ऑप.बँक लि. कोळसेवाडी | २९,२५३.९६ | |
| ७,९३८.५४ | डि.एन.एस. बँक | १९,८११.५४ | १,६१,१४,३९५.४० |
| | **गुंतवणूक** | | |
| १,८४,०२,४६५.०० | दि ठाणे डि. सें.को.ऑप. बँक लि.(राखीव निधी) | २,००,६०,६१०.०० | |
| ५७,८१,०००.०० | दि ठाणे डि.सें.को.ऑप. बँक लि.(इमारत निधी) | ५७,८१,०००.०० | |
| २५,००,०००.०० | दि ठाणे डि.सें.को.ऑप.बँक.(बु.आणि सं.क.नि) | २५,००,०००.०० | |
| ५,८८,६९,२३७.०० | जीएस महानगर को. ऑप. बँक लि. | ८,०७,०३,१२७.०० | |
| ६,३८,४४,५६५.०० | एसव्हीसी को. ऑप. बँक लि. | ४,७५,५५,९३२.०० | |
| ००.०० | दि नेव्हल डॉकयार्ड को. ऑप. बँक लि. | २,८०,००,०००.०० | |
| ३,५७,५३,६४९.०० | दि कॉसमॉस को. ऑप. बँक लि. | ५४,४०,३५६.०० | |
| २,७५,४९,३१४.०० | टीजेएसबी सह. बँक लि. | २,२६,७८,३८४.०० | |
| १,७९,३९,४४४.०० | दि ठाणे डि. सें.को.ऑप. बँक लि. (मुदत ठेव) | ५,१८,४२,४५६.०० | |
| २,००,००,०००.०० | सारस्वत को.ऑप. बँक लि. | २,५०,००,०००.०० | |
| १,००,०००.०० | डि. एन. एस. बँक लि. | १,०८,१५६.०० | |
| ००.०० | बँसीन कॅथॉलिक बँक | ४०,००,०००.०० | |
| ००.०० | नवजीवन को. ऑप. बँक लि. | २,५०,००,०००.०० | ३१,८६,७०,०२१.०० |
| | **सभासद कर्जे** | | |
| २,२६,०७,४६५.०० | वैयक्तिक जामिनकी | १,८१,८२,०६४.०० | |
| ६१,५५०.०० | ग्राहक कर्ज | २५,५५०.०० | |
| १४,३७,७६,४४७.०० | स्थावर मालमत्ता तारण | १५,९४,४०,५९१.०० | |
| ४२,०४,७२२.०० | व्यवसाय कर्ज | १७,७७,३६०.०० | |
| ३,५५,९३,७४४.०० | सोने तारण | ७,४०,३६,२०७.०० | |
| ३,२७,६३,५२८.०० | ठेव तारण | ३,५३,३६,७९९.०० | |
| ३४,७७,१३६.०० | कॅश क्रेडीट | ३३,८१,३९७.०० | |
| ७,०८,६९,७०८.०० | घर कर्ज | ७,२४,८४,७९८.०० | |
| १,०१,२८,७६१.०० | कर्मचारी गृह व वैयक्तिक कर्जे | ९१,४४,५५४.०० | ३७,३८,०९,३२०.०० |
| ५८,३६,८८,३००.६० | पुढील पानावर चालू.... | | ७०,८५,९३,७३६.४० |

## दिनांक ३१-३-२०२६ रोजीचे

| सन २०२४-२०२५ रक्कम रुपये पैसे | जबाबदारी व देणी | | सन २०२५-२०२६ रक्कम रुपये पैसे |
|---|---|---|---|
| ६०,९०,९५,३२८.६८ | मागील पानावरुन.... | | ७२,०७,७२,३१९.१८ |
| | **लाभांश देणे** | | |
| ३४,२४३.०० | सन २०२१-२०२२ | २०,९८८.०० | |
| २,०४,४२४.०० | सन २०२२-२०२३ | १,९५,८२१.०० | |
| ४९,९८०.०० | सन २०२३-२०२४ | ४८,५३४.०० | |
| ००.०० | सन २०२४-२०२५ | ५२,१५०.०० | ३,१७,४९३.०० |
| | **इतर देणी व तरतुदी** | | |
| २,१६,५६७.२४ | संगणक खरेदी तरतूद | २,१६,५६७.२४ | |
| ४,८४,३८३.०० | निवडणूक निधी तरतूद | ५,६४,२३५.०० | |
| २,००,५००.०० | कर्मचारी वेतन वाढ करार तरतूद | १३,५०,५००.०० | |
| १,५१,३८८.०० | सहकार प्रशिक्षण खर्च तरतूद | १,४९,९८८.०० | |
| ९,५८,६२३.०० | तंत्रज्ञान विकास निधी तरतूद | १३,२२,२७५.०० | |
| ३,३०,९९३.०० | कर्मचारी सानुग्रह अनुदान | ४,५६,५५५.०० | |
| ८,८९३.०० | ठेव प्रतिनिधी टी. डी. एस. देणे | ७,९७१.०० | |
| ४,६८,७०४.०० | शासकिय ऑडिट फी तरतूद | ५,३४,४१०.०० | |
| ९५,०००.०० | अंतर्गत ऑडिट फी तरतूद | ९५,०००.०० | |
| ६५,०००.०० | टॅक्स ऑडिट फी तरतूद | ७५,०००.०० | |
| ००.०० | मुल्यांकन खर्च | ३६,०००.०० | |
| ३,९२२.०० | कर्ज वसुली सरचार्ज देणे | ३,९२२.०० | |
| ००.०० | संड्री क्रेडीटर्स | ३,०००.०० | |
| ५९,३३२.०० | भविष्य निर्वाह निधी देणे | ५४,४१४.०० | |
